# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-८१७/२०२२

**अपिलार्थी, श्री.यशवंत विठ्ठल पवार**
**श्री समर्थ निवास, मुद्रे खुर्द**
**रिलायन्स पेट्रोल पंपासमोर, पो.गडगे**
**ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (सर्वसाधारण)
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, ता.अलिबाग,
जि.रायगड ४०२ २०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, ता.अलिबाग,
जि.रायगड ४०२ २०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३१.७.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.१२.२०२१ | ७.१.२०२२ | ३१.०१.२०२२ | २२.२.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि.११.३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती दिली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३१.७.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी हे ऑनलाईन उपस्थित असून त्यांचे प्रतिनिधी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उमाकांत साहेबराव कडनोर, तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड हे समक्ष उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" (*श्री.दिलीप जि.रायणावर तहसीलदार सुधागड पाली हे शासकीय सेवेत रुजू होण्यासाठी शासनास दाखल केलेले सर्व दस्त व शासन रुजू कोणत्या ठिकाणी झाले त्या त्या ठिकाणचे नियुक्ती पत्र या सर्व नस्तीच्या सत्यप्रती मिळण्याबाबत व इतर माहिती.*) "

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी उपस्थित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, सदरची माहिती वैयक्तिक स्वरूपाची माहिती असल्याने ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ञ) अन्वये दि.७.१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस नाकारण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या तपशिलाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांनी "*श्री. दिलीप जि. रायणावर हे शासन सेवेत रुजु होण्यासाठी शासनास दाखल केलेले सर्व दस्त व शासन रुजू कोणत्या ठिकाणी झाले त्या- त्या ठिकाणाचे नियुक्ती पत्र या सर्व नस्तीच्या सत्य प्रति मिळाव्यात.*" अशा आशयाची माहिती मागितली होती. ती वर नमूद केलेल्या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांनी नाकारली तसेच प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलिय अधिकारी यांनी त्यांचा आदेश दि.२२.२.२०२२ रोजी कायम ठेवला होता.

द्वितीय अपिलामध्ये अपिलाचे प्रयोजन नमूद करताना अपिलार्थी यांनी असे नमूद केले की, "*श्री. दिलीप जि. रायणावर यांनी शासनास नोकरी लागण्यासाठी खोटे दस्त सादर केले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.*" असे कारण दिले आहे. म्हणजेच त्यांनी संशयाच्या आधारावर वरीलप्रमाणे माहिती मागितली आहे असे दिसून येते. श्री.दिलीप जि. रायणावर यांनी शासन सेवेत दाखल होण्यासाठी कोणता दस्त दाखल केलेला आहे व असा संशय व्यक्त करण्यासाठी त्यांच्याकडे कोणते कारण आहे या संदर्भात त्यांनी द्वितीय अपिल अर्जात काहीही नमूद केलेले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केवळ संशयाच्या आधारावर अपिलार्थी हे श्री. दिलीप जि. रायणावर यांची वैयक्तिक स्वरूपाची माहिती मागत आहेत असे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती नाकारण्याचा निर्णय योग्य असल्याचे दिसून येत आहे. त्यामध्ये हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत द्वितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३१ जुलै, २०२४